# सोलापूर विद्यापीठ

**परीक्षा विभाग**

सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव,
सोलापूर - ४१३ २५५
ईपीएबीक्स - ०२१७-२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३/७४/७८/७९
फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल: coe@sus.ac.in

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# Solapur University

**Examination Section**

Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255
EPABX No.0217- 2744760/61/63/66/71/72/73/74/74/79
Fax No.0217-2744770
Web Site http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
email id: coe@sus.ac.in


Ref No.SUS/EXAM/2017-18/01632 Date : 14 JUL 2017

प्रति,

**१) मा.प्राचार्य/मा.संचालक,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये/संस्था,

**२) मा.संचालक,**
सर्व शैक्षणिक संकुले
**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.**

**विषय :** विविध अभ्यासक्रमांच्या Pattern २०१० व तत्पूर्वीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संधीबाबत.

**संदर्भ :** १.विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वे संदर्भातील विद्यापीठाचे पत्र क्र.९९१ दि.२६.५.२०१६
२.विद्यापीठाचे पत्र क्र. Ref No.SUS/EXAM/2016-17/1324 Date :18/07 /2016.

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, B.A.,B.Com.,B.Sc.,M.A.,M.Com.,M.Sc. या अभ्यासक्रमाच्या Pattern २०१० (वर्ष २०१२ पर्यंत प्रवेशीत) तसेच B.C.A.,B.B.A., B.Pharm.M.Pharm., D.B.M., PGDCA या अभ्यासक्रमाच्या Pattern २०१० (वर्ष २०१२ पर्यंत प्रवेशीत), Core Pattern व त्यापूर्वी प्रवेशीत विद्यार्थ्यांना संबधीत अभ्यासक्रमासाठी प्रवेशीत होवून ६ ते १० वर्षाचा कालावधी झालेला आहे.

तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार कोणतीही पदवी/पदव्यूत्तर पदवी ही विहीत कालावधीत (अभ्यासक्रम पूर्ण करणेसाठी लागणारा कालावधी) +२ वर्ष या कालावधीमध्येच पूर्ण करावी लागेल असे विद्यापीठाकडून सर्व महाविद्यालयांना दि.२६.५.२०१६ चे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, वर उल्लेख केलेल्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा पदवी पूर्ण करण्याचा विहीत कालावधी पूर्ण झाला असून या विद्यार्थ्यांच्या संधी संपलेल्या आहेत. तथापि विद्यार्थी हित लक्षात घेवून वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे B.A.,B.Com.,B.Sc.,M.A.,M.Com.,M.Sc या अभ्यासक्रमाच्या Pattern २०१० (वर्ष २०१२ पर्यंत प्रवेशीत) व B.C.A.,B.B.A., B.Pharm.M.Pharm. ,D.B.M.,PGDCA या अभ्यासक्रमाच्या Core, Pattern २०१० (वर्ष २०१२ पर्यंत प्रवेशीत) व त्यापूर्वी प्रवेशीत सर्व विद्यार्थ्यांना ऑक्टोबर २०१७ व मार्च २०१८ या परीक्षेची अंतीम संधी देण्यात येत आहे. या कालावधीपर्यंत संबधीत पदवी पूर्ण झाली नसल्यास मार्च २०१८ नंतर अशा विद्यार्थ्यांची संबधीत अभ्यासक्रमाची संपादणूक (Performance) रदद् केली जाईल/समजण्यात येईल. तसेच या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज स्वीकारण्यापूर्वी वरील आशयाचे हमीपत्र विद्यार्थ्यांकडून भरुन घ्यावे. त्याचप्रमाणे त्यांची इच्छा असेल तर नवीन अभ्यासक्रमानुसार प्रथम वर्षात प्रवेश घेणे आवश्यक आहे. मार्च २०१८ नंतर सदरील विद्यार्थ्यांचे जुन्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा आवेदनपत्र स्वीकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी. सदरील बाब सर्व विद्यार्थी , पालक, अध्यापक व सर्व संबधीतांच्या निदर्शनास आणून द्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

**संचालक,**
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रपत्र - अ

## <u>स्वयं घोषणा पत्र</u>

मी ---------------------------------------- या महाविद्यालयातील विद्यार्थी असून मी स्वयं घोषित करतो/करते की, ---------------- ही पदवी पूर्ण होण्याकरिता मी पॅटर्न २०१० मध्ये / वर्ष २०१२ पर्यंत प्रवेशीत विद्यार्थी असून माझी पदवी पूर्ण करण्याकरिता विद्यापीठाने दिलेल्या आणखी दोन संधींचा (ऑक्टो.२०१७ व मार्च २०१८) लाभ घेवून मी माझी पदवी मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करेन.

जर वरील दोन संधीमध्ये (मार्च २०१८ पर्यंत) माझी पदवी पूर्ण नाही झाली तर मी विद्यापीठाने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे नवीन पॅटर्न मध्ये ऑक्टोबर २०१८ ला प्रथम वर्षापासून प्रवेशीत होवून माझी पदवी पूर्ण करेन.

महाविद्यालयाचे नांव : दिनांकः

अर्जदाराचे नांव : अर्जदाराची सही :